**प्रेस नोट** **दि.३०/०३/२०१९**

## कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे शहर

## शासकीय जॅमर चोरास अटक

सुचेता वसंत खोकले, पोलीस निरीक्षक, नेमणूक - कोरेगाव पार्क वाहतुक विभाग, पुणे शहर हे कोरेगाव पार्क वाहतूक विभाग, पुणे शहर येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहेत.

दि.२३/०३/२०१९ रोजी साऊथ मेन रोड, लेन नं.४ जंक्शन, कोरेगाव पार्क , पुणे या ठिकाणी फिर्यादी हे ड्रंक अॅण्ड ड्राईव्ह कारवाई करता हजर असताना ०१:५० वा. सुमारास आरोपी नामे अभिषेक विनायक तांबे, रा. मु.पो. ओतुर, ता. जुन्नर, जि. पुणे हे त्याची कार वेडीवाकडी व धोकादायकरीत्या चालवत येत असल्यामुळे त्याची ब्रेथ अॅनालयझर मशिनद्वारे तपासणी केली असता तो मद्य प्राशन करून वाहन चालवत असल्याचे निष्पन्न झाला व त्याचे सोबत असणारे इतर ०४ आरोपी हे देखील मद्याच्या अंमलाखाली होते. त्यामुळे त्यांना पर्यायी वाहन चालक उपलब्ध करण्याबाबत व नाव पत्ता सांगितल्याशिवाय वाहन सोडणार नाही, अशी तोंडी समज फिर्यादी यांनी दिली होती. तसेच चालकाच्या बाजूच्या पुढील चाकास चावीचा एक लहान जामर लावला होता. परंतु त्यांनी नावे सांगितली नाहीत व पर्यायी चालक देखील उपलब्ध केला नाही. वाहन रस्त्यामध्ये सोडुन निघुन गेले. सदर वाहन चालक हे वाहन सोडुन जाताना फिर्यादीला म्हणाले की, तुम्ही काही करा, मी वाहन घेवुन जाणारच असे म्हणुन निघुन गेले. फिर्यादी यांनी सदर वाहनास सुरक्षेच्या दृष्टीने उर्वरीत तीन चाकास खेकडा जामर लावुन ठेवले होते. सदरचे जामर वर नमुद आरोपीतांनी संगनमताने फिर्यादीचे संमती शिवाय चोरून नेले, वगैरे मजकूरची फिर्याद दिल्याने वर नमूद इसमांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

दाखल गुन्हयातील आरोपी नामे अभिषेक विनायक तांबे, रा. मु.पो. ओतुर, ता. जुन्नर, जि. पुणे यास अटक करून त्याची पोलीस कस्टडीची रिमांड घेवून, त्याचे ताब्यातून ४ शासकीय जॅमर हस्तगत करण्यात आलेले आहे. सदरची कारवाई ही मा.श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार दिनेश शिंदे यांनी केलेली आहे.

(मदन बहाद्दरपुरे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे शहर